मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महापालिका कटिबद्ध : महापौर रवि लांडगे

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या किवळे येथील 75 सदनिकांची संगणकीय सोडत जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील आर्थिक दुर्बल घटकांतील प्रत्येक पात्र कुटुंबाला सुरक्षित आणि मूलभूत सुविधांनी सुसज्ज घर मिळाले पाहिजे, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. आर्थिक दुर्बल घटकांच्या किवळे प्रकल्पांतील सदनिकांची संगणकीय सोडत काढण्यात आली आहे. या सोडतीमध्ये निवड झालेल्या नागरिकांचे शहरातील स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले



पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे किवळे येथील आर्थिक दुर्बल घटकांच्या उर्वरित ७५ सदनिकांची चिंचवडमधील ऑटो क्लस्टर येथील सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संगणकीय सोडत काढण्यात आली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सोडतीतील विजेत्या सदनिका लाभार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात पत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, उपायुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त डी. डी. कांबळे यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> पिंपरी चिंचवड शहरातील आर्थिक दुर्बल घटकांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राधान्याची बाब आहे. या प्रकल्पांमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता आणि वेळेचे काटेकोर पालन सुनिश्चित केले जात आहे. नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असून आगामी काळातही अशा उपक्रमांना गती देण्यात येईल.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

महापौर रवि लांडगे पुढे म्हणाले, समाजातील सर्व घटकांना हक्काचं घर मिळावं हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचं स्वप्न आहे. पिंपरी चिंचवड शहरात नागरिकांचे घराचे स्वप्न केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून पिंपरी चिंचवड महापालिका पूर्ण करीत आहे, असे देखील महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपायुक्त अण्णा बोदडे यांनी सांगितले की, शहरातील आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना सुरक्षित व मूलभूत सुविधांनी युक्त निवारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. विजेत्या लाभार्थ्यांनी स्वहिस्सा रक्कम भरणे व अनुषंगिक बाबीसाठी साठी झोपडपट्टी विभागात संपर्क साधावा असे देखील म्हणाले.

---

# पहिली 'पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग' महिलांची टी-20 क्रिकेट स्पर्धा सुरू

## हिंजवडी येथील मैदानावर उद्घाटनाच्या दिवशी ऐश्वर्यम चॅलेंजर्स व नायर ईगल्सचा विजय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित पहिल्या 'पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग' (पीसीपीएल) महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेची दमदार सुरुवात झाली. हिंजवडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उद्घाटनाच्या दिवशी ऐश्वर्यम चॅलेंजर्स आणि नायर ईगल्स या संघांनी प्रभावी विजय नोंदवत आपली ताकद दाखवून दिली.



पहिल्या सामन्यात सहेज कौर हिच्या नाबाद ५१ धावांच्या शानदार खेळीच्या जोरावर ऐश्वर्यम चॅलेंजर्स संघाने बन्ट वॉरियर्सवर ७ गडी राखून सहज विजय मिळवला. बन्ट वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १३७ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऐश्वर्यम चॅलेंजर्सने १८ षटकांतच लक्ष्य गाठले. सहेज कौर आणि नीती अगरवाल (४७ धावा) यांनी तिसऱ्या गड्यासाठी ९९ धावांची भक्कम भागीदारी करत संघाचा विजय निश्चित केला. सहेज कौर हिला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले, तर ऋतुजा गिलबिले हिला 'फायटर ऑफ द मॅच' पुरस्कार मिळाला.

दुसऱ्या सामन्यात इशा घुले हिने केलेल्या ८७ धावांच्या तडाखेबाज खेळीच्या जोरावर नायर ईगल्स संघाने ऑक्सिरीच संघावर १९ धावांनी मात केली. नायर ईगल्सने प्रथम फलंदाजी करत १५९ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात ऑक्सिरीच संघ १४० धावांपर्यंत मजल मारू शकला. इशा घुले हिला सामनावीर, तर स्वांजली मुळे हिला 'फायटर ऑफ द मॅच' पुरस्कार देण्यात आला.

या स्पर्धेचे उद्घाटन आमदार उमा खापरे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी असोसिएशनचे सचिव राजू कोतवाल, बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक संचयाना कुमार दास, सहसचिव दिलीपसिंह मोहिते, खजिनदार संजय शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार उमा खापरे यांनी महिला क्रिकेटपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे सांगितले. या स्पर्धेतून अनेक गुणवान महिला खेळाडू पुढे येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सचिव राजू कोतवाल यांनीही शहरात क्रिकेटचा विकास आणि नवोदितांना संधी देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी झालेल्या रंगतदार सामन्यांमुळे प्रेक्षकांना क्रिकेटचा रोमांचक अनुभव मिळाला असून पुढील सामनेही तितकेच उत्साहवर्धक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची कारवाई

## ‘ड’ आणि ‘ह’ क्षेत्रीय कार्यालयांतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई; आयुक्तांच्या आदेशानंतर कारवाईला वेग

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये अनधिकृत बांधकामांविरोधात व्यापक कारवाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पिंपळे गुरव येथील ५३० चौ.मी. तसेच ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नवी सांगवी परिसरातील १ हजार ५४५ चौ.मी. अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या आरसीसी बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच इतर नियमबाह्य उभारण्यात आलेली बांधकामे देखील पाडण्यात आली.

मागील आठवड्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयनिहाय करण्यात येणाऱ्या अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांच्या विरोधातील धडक निष्कासन कारवाईचा आढावा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नुकताच घेतला. त्यानंतर शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कारवाई अधिक सक्त करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित अधिकाऱ्यांनी शहरातील विविध भागांमध्ये व्यापक कारवाई मोहीम हाती घेतली आहे.

ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या नेतृत्वात वार्ड क्र. २९, पिंपळे गुरव येथील गणेशनगर, साईनाथनगर, लक्ष्मीनगर परिसरातील एकूण ५३० चौ.मी. आरसीसी बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईवेळी उपअभियंता शाम गर्जे, बीट निरीक्षक विक्रम चव्हाण, राहुल निकम, उमेश लोंढे, ओंकार देशमुख, पूजा राठोड तसेच १३ एमएसएफ जवान, ७ मजूर, २ पोलीस, २ ट्रॅक्टर ब्रेकर आणि १ जेसीबी सहभागी होते.

ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वार्ड क्र. ३१ मधील नेताजी नगर, गांगर्डे नगर, विनायक नगर, गजानन नगर या भागात क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या नेतृत्वात एकूण १ हजार ५४५ चौ.मी. आरसीसी बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या धडक कारवाईत उपअभियंता प्रताप मोरे, कनिष्ठ अभियंता जयवंत रोकडे, बीट निरीक्षक शाबोद्दिन बागबान, रोहन कांबळे, प्रफुल्ल भोकरे, सुरज माने तसेच १८ एमएसएफ जवान, १० मजूर, २ ट्रॅक्टर ब्रेकर आणि १ जेसीबी यांच्या सहाय्याने ही कारवाई पार पडली.




### पिंपळे गुरव, नवी सांगवीत मोठी

» महापालिकेने ड आणि ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मोठी निष्कासन कारवाई केली. पिंपळे गुरवमधील गणेशनगर, साईनाथनगर, लक्ष्मीनगर भागातील ५३० चौ.मी. आरसीसी बांधकामे हटविण्यात आली. तर नवी सांगवीतील नेताजीनगर, गांगर्डे नगर, विनायक नगर, गजानन नगर परिसरातील १,५४५ चौ.मी. अनधिकृत आरसीसी बांधकामांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेत जेसीबी, ट्रॅक्टर ब्रेकर, मजूर, एमएसएफ जवान आणि पोलिसांचा मोठा ताफा सहभागी होता.

### आयुक्तांच्या आदेशानंतर कारवाईला वेग

» पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे आणि अतक्रमणांविरोधातील कारवाई अधिक सक्त करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्यानंतर प्रशासनाने धडक मोहीम सुरू केली आहे. मागील आठवड्यात क्षेत्रीय कार्यालयनिहाय आढावा बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध भागांत मोहीम राबविण्यात येत आहे. शहराचा नियोजनबद्ध विकास आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.

> “ पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्यात यावी. या कारवाईचा नियमित आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी सातत्याने पाहणी करावी. रस्त्यावर स्टॉल लावणाऱ्या फेरीवाल्यांवर देखील कारवाई करण्यात यावी. नागरिकांच्या सुरक्षेच्या तसेच शहराच्या नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने ही कारवाई अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावी. नागरिकांनीही नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# आरटीओ सेवा पूर्णपणे ऑनलाईन; ‘सारथी’ आणि ‘वाहन 4.0’मधून 105 सेवा उपलब्ध

## ड्रायव्हिंग लायसन्सपासून वाहन नोंदणीपर्यंत सर्व सेवा घरबसल्या; पारदर्शकता आणि वेग वाढणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

आरटीओ कार्यालयातील कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी; तसेच नागरिकांची धावपळ थांबवण्यासाठी सारथी आणि वाहन4.0 या डिजिटल प्रणालीद्वारे सुमारे 105 सेवा ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या आहेत. आरटीओ कार्यालय पूर्णपणे ऑनलाईन प्रणालीशी जोडले गेले आहे. त्यामुळे नागरिक व वाहनचालकांना आरटीओ कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार नाहीत.

सारथी व वाहन 4.0 या डिजिटल प्लॅटफॉर्मवर वाहन नोंदणी, पत्ताबदल, नूतनीकरण, डुप्लिकेट आरसी, ड्रायव्हिंग लायसन्स, ई-चलान, वाहन मालकी हस्तांतरण इत्यादी 105 सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांचे काम वेळेत होणार असून, या सुविधांसाठी एजंटची गरज लागणार नाही. पूर्वी वाहनासंबंधित कागदोपत्री कामकाजासाठी नागरिकांचा तसेच वाहनचालकांचा आरटीओ कार्यालयात वेळ जात असे; परंतु नागरिकांना आता घरबसल्या विविध सुविधा उपलब्ध झाल्याने हे काम वेगवान सुरळीत होणार आहे.

सारथीमार्फत मिळणाऱ्या सेवामध्ये शिकाऊ अनुज्ञप्ती आणि अनुज्ञप्ती परवाना अर्ज, वर्ग जोडणी, ऑनलाईन टेस्ट अपॉइंटमेंट बुकिंग करणे, अनुज्ञप्ती परवाना नूतनीकरण, नवीन वाहन वर्ग जोडणे, दुबार अनुज्ञप्ती परवाना , पत्ता बदल, अर्ज स्थिती आदी सेवा ऑनलाईन उपलब्ध झाल्या आहेत. तसेच वाहन नोंदणी 4.0 द्वारे वाहन नोंदणी, मालकी हस्तांतरण, दुबार आरसी, एनओसी, ई-चलान, वाहन फिटनेस प्रमाणपत्र भरणे, पत्ता बदल, आदी सेवा सुरू करण्यात आल्या आहेत.



> “ सारथी आणि वाहन 4.0 या ऑनलाईन सुविधेमुळे नागरिकांना आता कार्यालयात हेलपाटे मारण्याची गरज नाही. देशभरातील आरटीओ कार्यालयाने पूणपणे ऑनलाईन जोडले गेले आहेत. त्यामुळे नागरिकांना आता थेट सरकारी पोर्टलवर अर्ज करता येणार आहे. त्यामुळे सेवा आधिक पारदर्शक आणि जलद होणार आहे.
>
> - राहुल जाधव उपप्रादेशिक परिवहन अधिकारी.

# पुण्यात सध्या पाणी कपात नाही : आयुक्त नवल किशोर राम

## जलसंपदा विभागाच्या नोटीसमुळे चर्चांना उधाण; धरणात साठा असल्याने पुणेकरांना दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून शहरात उन्हाचा तडाखा वाढत चालला आहे. वाढत्या उन्हामुळे नागरिक हवालदिल झाले असताना यंदाच्या वर्षी कमी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आला. त्यामुळे पाण्याची गरज भागविण्यासाठी धरणात उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याचे आव्हान महापालिका प्रशासनासमोर आहे.

शाळा पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा कमी होत असल्याने महापालिका प्रशासनाने पाणी कपात करावी अशी नोटीस पंधरा दिवसापूर्वी जलसंपदा विभागाने महापालिकेला बजावली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी देखील महापालिकेला केवळ मंजूर असलेला पाण्याचा कोटा दिला जाणार असल्याचे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात पाणी कपात होणार? अशी जोरदार चर्चा सुरू झाली आहे. यावर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली आहे.

'शहराला आवश्यक असलेले पाणी महापालिका खडकवासला धरणातून घेत आहे. शहराची लोकसंख्या आणि त्या तुलनेत मिळणारे पाणी यामध्ये मोठा फरक असून, पाण्याचा वाढीव कोटा मिळावा, यासाठी जलसंपदा विभागाकडे तसेच राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. धरणात पुरेसे पाणी असल्याने सध्या तरी पुणेकरांच्या पाण्यात कोणतीही कपात केली जाणार नाही,' असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले.

यंदाच्या वर्षी पाऊस कमी होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. पावसाला उशिरा सुरुवात होण्याची शक्यता असल्याने महापालिकेने पाणी काटकसरीने वापरावे. धरणातील उपलब्ध पाणी अधिकाधिक दिवस पुरविण्याचे आव्हान महापालिकेसमोर असल्याने आतापासूनच १५ टक्के पाणीकपात महापालिकेने सुरू करावी, अशी नोटीस जलसंपदा विभागाने महापालिकेला पाठविली आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या इशाऱ्यांनंतर महापालिका पाणीकपात सुरू करणार का, अशी चर्चा सुरु झाली होती.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी परिसरात मागील वर्षीच्या तुलनेत यंदा अधिक पाणीसाठा शिल्लक आहे. पाण्याची गळती थांबविण्यासाठी महापालिकेचा पाणीपुरवठा विभाग प्रयत्नशील असून अनेक भागांत पाण्याचे मीटर बसविले जात आहेत. सध्या महापालिका प्रशासन जसलंपदा विभागाने निश्चित करून दिलेल्या कोट्यानुसारच पाणी उचलत आहे. त्यामुळे सध्या तरी पाणीकपात करण्याचे कोणतेही नियोजन नसल्याचे आयुक्त राम यांनी स्पष्ट केले.




### जून-जुलैमध्ये निर्णय शक्य

» महापालिका प्रशासनाने जून आणि जुलै महिन्यातील पावसाची स्थिती पाहून पुढील निर्णय घेतला जाईल, असे सांगितले आहे. जर पाऊस समाधानकारक झाला तर पाणीपुरवठा सुरळीत राहू शकतो. मात्र, पाऊस कमी राहिल्यास भविष्यात कपातीचा विचार केला जाऊ शकतो. दरम्यान, पाण्याची गळती थांबविणे, मीटर बसविणे आणि काटकसरीने वापर यावर महापालिका भर देत आहे. नागरिकांनीही पाणी जपून वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सध्या पाणी कपात नाही

» पुणे शहरात सध्या तरी पाणी कपात करण्याचे कोणतेही नियोजन नसल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले आहे. खडकवासला धरण साखळीमध्ये सध्या पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार अधिक पाणी कोट्यासाठी राज्य सरकार आणि जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे सध्या पुणेकरांच्या पाणीपुरवठ्यावर तातडीचा परिणाम होणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### जलसंपदा विभागाची नोटीस

» यंदा पावसाचा अंदाज कमी असल्याने जलसंपदा विभागाने महापालिकेला १५ टक्के पाणी कपात सुरू करण्याची नोटीस पाठविली आहे. पावसाला उशिरा सुरुवात होण्याची शक्यता लक्षात घेऊन धरणातील पाणी जास्त दिवस टिकविण्यासाठी काटकसरीचा सल्ला देण्यात आला आहे. या नोटीसमुळे शहरात पाणी कपात होणार का, याबाबत चर्चा रंगली होती. मात्र, सध्याच्या परिस्थितीत कपात होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पुण्यात ओव्हरहेड केबल्स भूमिगत करण्याचा आराखडा

## अनियंत्रित केबलजाळ्यावर नियंत्रणासाठी महापालिकेची नवी धोरणात्मक पावले

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात वाढलेल्या ओव्हरहेड केबल्सच्या अनियंत्रित जाळ्यामुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन महापालिकेने या केबल्सचे शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि टप्प्याटप्प्याने भूमिगत करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली आहेत. विनापरवाना वाढलेल्या केबलजाळ्याचे नियमन करण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि संबंधित संस्थांच्या सूचनांच्या विचारातून अंतिम मानक कार्यपद्धती तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. हा मसुदा लवकरच आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे सादर होणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी सांगितले

ओव्हरहेड केबल्समुळे वाढणारे अपघाताचे धोके आणि शहराच्या सौंदर्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन या प्रश्नावर त्वरीत उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली आहे. मंगळवारी (दि. 21) अतिरिक्त आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीस मुख्य अभियंता (विद्युत) मनीषा शेकटकर, मुख्य अभियंता (पथ) राजेश बनकर आदी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील विविध प्रकारच्या ओव्हरहेड केबल्सचा सविस्तर आढावा घेण्यात आला. टेलिकम्युनिकेशन कायदा आणि विद्यमान धोरणांनुसार केबल टाकण्याची पद्धत अधिक सुसूत्र करण्यावर भर देण्यात आला. महापालिकेकडून यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणाचा आधार घेत उर्वरित भागांचे सर्वेक्षण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

नागरिकांना अडथळा होणार नाही, अपघात टाळता येतील आणि शहराचे सौंदर्य अबाधित राहील अशा पद्धतीने केबल व्यवस्थापन करण्यावर भर देण्यात आला. हैदराबादच्या धर्तीवर ओव्हरहेड केबल्ससाठी उंचीची मर्यादा निश्चित करणे तसेच स्वतंत्र पोल उभारणीसाठी भाडेदर निश्चित करण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.



### अंतिम धोरण लवकरच जाहीर

» शहरातील वाढत्या ओव्हरहेड केबल्सच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापालिकेचे अंतिम मानक कार्यपद्धती धोरण अंतिम टप्प्यात आले आहे. लोकप्रतिनिधी, तज्ज्ञ आणि संबंधित संस्थांच्या सूचनांचा विचार करून हा मसुदा तयार करण्यात आला आहे. लवकरच तो आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे सादर केला जाणार आहे. या धोरणामुळे विनापरवाना केबल्सना आळा बसणार असून शहरात शिस्तबद्ध केबल व्यवस्थापन होईल. अपघात टळणे, रस्ते मोकळे राहणे आणि शहराचे सौंदर्य टिकवणे या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

# बारामती पोटनिवडणूक: ईव्हीएम-व्हीव्हीपॅट कमिशनिंग पूर्ण

## मॉक पोलद्वारे पारदर्शकता तपासली; मतदानासाठी 12 ओळखपत्रे ग्राह्य

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी गुरुवारी (दि. 23) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांची कमिशनिंग प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. निवडणुकीला उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी निश्चित झाल्यानंतर तसेच ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांची दुसरी याहच्छिक निवड पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्रनिहाय ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांचे कमिशनिंग करण्यात येते. यामध्ये राखीव ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांचाही समावेश असतो

ही प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर पार पाडली जाते. कमिशनिंग प्रक्रियेत बॅलेट युनिटवर बॅलेट पेपर बसविणे, कंट्रोल युनिटमध्ये उमेदवारांची नोंद करणे तसेच व्हीव्हीपॅटमध्ये चिन्हे लोड करणे यांचा समावेश असतो. ईव्हीएम व व्हीव्हीपॅट कमिशनिंगसंदर्भातील सविस्तर सूचना 'इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन मॅन्युअल'मध्ये देण्यात आलेल्या असून, ते भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.




### मतदानासाठी तयारी पूर्ण

» बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. मतदानासाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रांची कमिशनिंग प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. उमेदवारांची अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर मतदान केंद्रनिहाय यंत्रांचे वाटप करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या देखरेखीखाली ही प्रक्रिया पार पडली. मतदान केंद्रांवर आवश्यक साहित्य, कर्मचारी आणि सुरक्षा व्यवस्था सज्ज ठेवण्यात आली असून शांततेत मतदान पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे.

### मतदारांसाठी महत्त्वाची सूचना

» मतदानासाठी मतदार ओळखपत्र नसले तरी अन्य १२ प्रकारचे ओळखपुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, बँक पासबुक, शासकीय ओळखपत्र आदींचा समावेश आहे. संबंधितांपैकी कोणताही एक मूळ पुरावा दाखवून मतदारांना मतदान करता येणार आहे. मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास बंदी असल्याने नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### मॉक पोलद्वारे पारदर्शकता

» निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी याहच्छिक पद्धतीने निवडलेल्या ५ टक्के ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांवर मॉक पोल घेण्यात आला. प्रत्येकी १ हजार मते टाकून एकूण ३० यंत्रांवर चाचणी करण्यात आली. त्यानंतर ३० हजार व्हीव्हीपॅट स्लिप्सची मोजणी करून निकाल कंट्रोल युनिटशी जुळविण्यात आला. या प्रक्रियेमुळे यंत्रांवरील विश्वास अधिक दृढ झाला असून निवडणूक आयोगाने पारदर्शकतेला प्राधान्य दिल्याचे दिसून आले.

बारामती पोटनिवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांचे कमिशनिंग 17 ते 18 एप्रिल या कालावधीत महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोदाम, एमआयडीसी क्रमांक 4 बारामती येथे निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्निल रावडे यांच्या देखरेखीखाली करण्यात आले.

या प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी सर्व उमेदवारांना स्वतः उपस्थित राहण्याचे किंवा त्यांच्या प्रतिनिधींना नियुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार उमेदवार डॉ. विजयकुमार भिसे हे कमिशनिंग प्रक्रियेसाठी उपस्थित होते. तसेच निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी याहच्छिक पद्धतीने निवडलेल्या 5 टक्के ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांवर प्रत्येकी 1 हजार मते टाकून 'मॉक पोल' घेण्यात आला. या प्रक्रियेत एकूण 30 ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांचा वापर करण्यात आला असून, 30 हजार व्हीव्हीपॅट स्लिप्सची मोजणी करून ती कंट्रोल युनिटमधील निकालाशी जुळविण्यात आली.

कमिशनिंग प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रे भारत निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या सुरक्षा व साठवण प्रोटोकॉलनुसार स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. मतदान साहित्य वितरणाच्या दिवशी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत आणि व्हिडीओ चित्रीकरणासह स्ट्राँग रूम उघडणे व बंद करणे ही प्रक्रिया पार पडणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली.

# उजनी धरणाचा पाणीसाठा 25.18 टक्क्यांवर; दुष्काळाची चिन्हे गडद

## कमी पावसाचा अंदाज, पाणीटंचाईची भीती; झपाट्याने खालावणारा पाणीसाठा बळीराजाच्या चिंतेत भर

**पुणे | प्रतिनिधी**

बघता बघता उजनी धरणाची पाणीपातळी वेगाने खलावू लागली असून, उजनीचा उपयुक्त पाणीसाठा 25.18 टक्क्यांवर आला आहे. साहजिकच लवकरच उजनी मायनसमध्ये जाणार आहे. यंदा पाऊसमान कमी असल्याचा अंदाज वर्तविण्यात आल्याने व उजनीचा झपाट्याने खालावणारा पाणीसाठा बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकवणारा ठरू पाहात आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात उजनी पाणलोट क्षेत्रात पाण्याची तीव्र टंचाईचा सामना धरणग्रस्त शेतकरी व गावांना बसत असतो.



अगदी फेब्रुवारीपर्यंत उजनीत 100 टक्के पाणीसाठा उपलब्ध असतो, परंतु फेब्रुवारीच्या मध्यापासून ते मेअखेर उपायुक्त साठा संपून उजनी मायनसमध्ये जाते. त्यामुळे पाणलोट क्षेत्रातील धरणग्रस्तांची पाण्यासाठी वणवण पाहावयास मिळते. उजनीच्या पाण्यावरून पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील राजकारण देखील तापते. वास्तविक नियोजनाचा अभाव असल्याने धरणग्रस्तांच्या वाट्याला पाणीटंचाई पुजलेली आहे.

गेल्या प्रचंड प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने व धरण भरल्याने यावर्षी पाणीटंचाई जाणवणार नाही अशी आशा होती; मात्र, सद्यस्थिती पाहता या आशेवर पाणी फेरण्याची शक्यता आहे. मुळात तर या वर्षीच्या पावसाचा अंदाज व भाकीत पाहता पाणी काटकसरीने वापरणे गरजेचे आहे. यापूर्वी दुष्काळ पडल्यानंतर काय स्थिती उद्भवते हे धरणग्रस्तांनी पाहिले आहे. पाण्याच्या एका थेंबासाठी संघर्षाची वेळ या भागावर आलेली आहे. धरणकाठच्या गावांच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर येण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेऊन पाण्याचे काटकसरीचे नियोजन हवे.

### प्रशासनाने बोध घेण्याची गरज

» यावर्षीच्या कमी पावसाचा अंदाज व भाकीत लक्षात घेऊन आणि पाणीटंचाईचा पूर्वानुभव लक्षात घेणे गरजेचे आहे. कारण दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास पाच टीएमसी पाणी उजनीत आणता आणता कसा घाम आणि फुगा येतो याचा पूर्वानुभव प्रशासनाने घेतला असल्याने याचा बोध घेण्याची गरज आहे.